************ प्र क र ण ति स रे ************

सामाजिक चित्रण

-0-0-0-0-0-

# प्रकरण : तिसरे

## "भंडारभोग" व "चौंडकं" मधील सामाजिक चित्रण

मागील प्रकरणात "भंडारभोग" व "चौंडकं" या कादंबरीतील व्यक्तिरेखाचा वाङ्‌मयीन दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. या प्रकरणात "भंडारभोग" व "चौंडकं" या दोन कादंबरीतून सामाजिक चित्रण कशाप्रकारे झाले आहे, याचा अभ्यास करावयाचा आहे. कादंबरी वाङ्‌मय हा सामाजिक आशयदक्ष असलेला प्रकार आहे. त्यामुळे एखाद्या कादंबरीतील सामाजिक जीवनांचे चित्रण प्रत्ययी आहे की नाही हे व्यक्तिचित्रण आणि समाज जीवनांचे चित्रण यावरून समजून येते. भालचंद्र नेमाडे यांनी कादंबरी आणि सामाजिक जीवन याचा विचार केला आहे. त्यांच्या मते " कादंबरीत सामाजिक आशय प्रामुख्याने असावा लागतो. एकाधा समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भात मांडलेला असतो. एकाधा पोटसमुहांचे, पोट संस्कृतीचे तपशीलासह दर्शन घडवले असते. संपूर्ण काळाचा कींवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी राहतात. यातूनच कादंबरीचे संपूर्ण समाज दर्शन चित्रित होते."[१] कादंबरीकार आपल्या आशयाचे जे जे तपशील संरचनेसाठी निवडतो ते सर्व व्यक्ती आणि समाज यांच्याशी सलंग्न असतो. त्यामुळे आपोआपच सामाजिक जीवनांचे चित्रण येते.

"भंडारभोग" व "चौंडकं" या कादंबरीत अनुक्रमे जोगत्याचे व देवदासीचे चित्रण हे प्रत्ययी आले की नाही हे पाहण्यासाठी लेखकाने समाज जीवनांचे चित्रण कशाप्रकारे केले आहे हे पाहणे महत्वाचे आहे. जोगत्यांचे व देवदासीचे निरनिराळे धार्मिक विधी, त्यांचे कौटोंबिक व सामाजिक जीवन, समाजातील अंधश्रध्दा परंपरा व स्त्री अशा विविध स्वरुपाचे चित्रण कशाप्रकारे केलेले आहे, व ते सामाजिक वास्तवालाधरून झाले की नाही याचा अभ्यास याठिकाणी अभिप्रेत आहे.

प्रथमत: भंडारभोग या कादंबरीतील सामाजिक चित्रण कशाप्रकारे झाले आहे याचा अभ्यास पाहू.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"भंडारभोग" कादंबरीमधील धार्मिक विधी -

जोग्याना सुत गुंडाळण्याचा विधी

सुत गुंडाळणे व लिंब नेसल्या नंतरच त्याला जोग्या म्हणून ओळखलं जात. हा विधी ठराविक महिन्यात केला जातो. तोही देवीच्या देवळा शेजारी केला जातो. म्हाईच्या पुनवेला यल्लमा देवी जत्रा भरते. त्यावेळी जोग्यांचा व देवदासीचा विधी केला जातो. हा विधी करण्यासाठी दोन जोगतिणी व एक जोगता स्वखर्चाने न्यावा लागतो.

यल्लामा देवीच्या डोंगराला जाताना गावातील प्रमुख जोगतिण असते. लिंब नेसणाऱ्यानी प्रथम मनोळीच्या नदीत आंघोळ करावी लागते. जोगतिणीचा जो प्रमुख देवीचा जग मधोमध ठेवला जातो. सभोवती पाच परड्या मांडल्या जातात. वाळल्या निवदानं भरतात. नारळ फोडला ठेवतात. उदकाडी लावली जाते. कापराची वडी लावली जाते. "उदं ग आई उदं" मोठ्यानं म्हटलं जाते. लिंबाच्याकाड्याची पेंडी सोडून ज्याला सुत गुंडाळायचे असते. त्याला उगवतीकडं तोंड उभे करतात. कमरेला सुत गुंडाळतात. त्या सुताला लिंबाची एक एक काडी बांधतात. डोक्यावर दोन मोठाल्या लिंबाच्या काड्या ठेवतात. तोंडात एक लिंबाची काडी देतात. जोगळभावीपर्यंत तोंडातील काडी काढायची नसते.

जोगळभावीजवळ असणाऱ्या देवाजवळ गुरुपद जोग्याचे तंबू असतात. त्या तंबूतील एक जोग्याला घेऊन जोगळभावी जवळ असणाऱ्या तलावात आंघोळ करायची. आंघोळ झाल्यानतंर पानाचा विडा व लिंबाची काडी हातात घेऊन देवळाभोवती फेऱ्या माराव्या लागतात.

ज्याला सुत गुंडाळ्याचे असते. त्याला जो जोग्यांचा प्रमुख असतो. तो गुरु असतो. त्याच्याकडून दीक्षा घ्यावी लागते. प्रथम ज्याला सुत गुंडाळ्याचे त्याला हिरवं लुगडं नेसवतातं. अंगात हिरवं झंपर घालतात. बारिंग बांधतात. कट्यारीला पटका बांधतात. कट्यारीला मंडोळ्या

बांधतात. हळदीचो पाच बोट गालावर पुसतात. गालाला काळी टिक्की लावतात. पांढरा शुभ्र अंतरपाट ओल्या हळदीनं स्वस्तिक काढतात. मुठभर तांदूळ भंडा-यात घोळवतात. चौघीजणाच्या हातात देतात. जोग्याला चुडा भरतात. मधोमध चौरंग ठेवतात. पाच परड्या चौरंगाजवळ ओळीने पुजतात. प्रत्येक परडीजवळ एक नारळ, एक कापड, एक तांब्या व तांब्यात एक खारीक टाकली जाते. परडीतं ओला व सुका नैवेद्य भरतात. दहीभाताचा नैवेद्य शेजारीच केळीच्या पानावर ठेवतात. गुरुला चौरंगावर मांडी घालून बसवतात. जोग्याला उगवतीकडं तोंड करून बसवतात. भंडारा व कुंकू लावतात, जोग्याचे डोकं गुरूच्या मांडीवर ठेवतात व समोर कट्यार धरतात. दोघांच्यामध्ये अंतरपाट धरतात. गुरूच्या हातात दुधाची वाटी हातात देतात. पाच जोगतिणी त्या पाच परड्याना हात लावतात व " उदं आई उदं " म्हणत पाच वेळा परड्या हालवतात. गुरुनं हातातील खारीक खोबरं जोग्यावर टाकतो. दूधाची वाटी त्याच्या तोंडला लावतो. जोग्याला उठवून चौरंगाभोवतीनं फिरवतात. सायंकाळी बाशिंग सोडतात. दहीभाताचा नैवेद्य केला जातो. तो दहीभात घेऊन वेणी कुंडालाजवळ जायचे व जोग्यावरून हा दहीभात दोन्ही बाजूला उतरून टाकतात व डोळ्याला पाणी लावतात. त्यादिवशीपासून जोग्या बनतो.

अशातऱ्हेने जोग्याचा लग्न विधी केला जातो. लेखकांने या विधीसाठी लागणा-या वस्तु व त्याची माहिती, व विधी कशाप्रकारे केला जातो याची सर्व माहिती यथार्थ स्वरुपात दिली आहे.

oooo गुरुपदाची दीक्षाoooo

समाजात निरनिराळे पंथ आढळतात. तसा जोग्यांचा पंथ आढळतो. त्याचाही समाज असतो. त्या समाजात जोग्याला सामील करून घेण्यासाठी विधी केला जातो. त्याला गुरुपदाची दीक्षा म्हणतात. तायाप्पा जोग्या बनतो, त्याला जोग्यांच्या पंथात घेण्यासाठी विधी करतात.

तायाप्पाला गुरुपदाची दीक्षा राघु कदम या जोग्याकडुन दिली जाते. प्रथम गावातील कुंडाला जाऊन यावे लागते. गोंदायला डोंबारीन लागते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

गुरु प्रथम चौरंगावर नवे कापड घालतो. त्या कापडाच्या मधोमध तांदळाचा मांड भरतात. नव्या कापडावर भंडाऱ्याच्या टिकल्या लावतात. त्या तांदळावर परडी ठेवली जाते. त्या परडीत तांदूळ व नारळ ठेवतात. तायाप्पाला चौरंगावर बसवतात. दोन गुरु, दोन पाटावर बसतात. तायाप्पाच्या हातावर एक गोंदून वर्तुळ काढतात. त्या वर्तुळात गुरूंचे नाव लिहतात. गुरु त्या जोग्याचा हात हातात घेऊन फटफटतो. पिसवीतला भंडारा जोग्याच्या कपाळाला लावतात; आणि पेल्यातील दुध ओंजळीनं जोग्याला देतात. सगळीजण टाळ्या वाजवतात. परडीतील कवडयाची माळ जोग्याच्या गळ्यात घालतात. सगळीजण हात जोडतात " आई यल्लामा देवी बुवराम्मा तुम्हा दोघीचा मी सेवक .... बायली पंथाचा गुरु म्हणून तायाप्पाला पंथात घेतलंय! झाडाची राखण कर, बरकतीला आण."[२]

संध्याकाळी जोग्याची व जोगतिणीची जेवणं होतातं. जोगतीणीना नारळ-चोळी दिली जाते. गुरुला नवीन लुगडं नेसवलं जातं. जोग्यानांही खण-नारळ दिला जातो. अशा तऱ्हेने त्या जोग्याला पंथात घेतले जाते. पंथात घेतले जाते. पंथानुसार त्याला वागावे लागते.

आळत्याची रांडपुनव यात्रा -

ही जत्रा आळत्याला भरते. सर्व रांड पुनवेला भागातील जोग्ये व देवदासी एकत्र येतात. सर्व जोग्ये व देवदासी एकत्र आल्यामुळे ख्याली खुशाली कळते. एकमेकांच्या भेटी होतात. प्रत्येक जोग्यानं रांडपुनव यात्रेला गेले पाहिजे. " जोगत्याच्या जलमात रांडा वपुनाव तेवढीच म्हातमाची. ती चुकल्यावर जोगता कसला ?"[३] आळत्याच्या देवासमोर ओल्या लाकडाचा ढीग पेटवतात. तो ढीग धुमाय लागतो. त्या धुमणाऱ्या ढीगाभोवती जोग्ये व जोगतिणी फेर धरतात व परसराम नाचवायला सुरवात करतात. " नाचवाऽऽ गऽऽ नाचवा परसराम किचवाऽऽ त्येवा किच जागवा रांड पुनाव भोगवा ."[४] सर्व ओरडतात. जोग्याचा दुसरा ताफा धुमणाऱ्या लाकडाकडे येऊ लागला की ओरडणाऱ्या जोग्यांनी आपल्या हातातील कांकणाचे तुकडे करायचे. धुमणाऱ्या

ढिगात टाकायचे. ऊर बडवून रडायचे, एकमेकाच्या गळ्यात पडून रडायचे. गळ्यातल्या जुन्या दर्शनाच्या माळा तोडायच्या, त्याही ढिगात टाकून गळ्यात नवं दर्शन घालतात. अशाप्रकारे रांडपुनवचा विधी केला जातो.

जोग्याचा दफन विधी

जोग्या मरण पावल्यावर गावातील कुणीच येत नाही. फक्त जोग्ये व जोगतिणी येतात. जोग्याचं प्रेत गावाबाहेरच्या गोटण्यात पुरले जाते. " आगं, आपल्याला गोटण्याशिवाय दुसरी जागा नसती गावची जनावरं आणि आमी एका जाग्यालाच."[५] गावाबाहेरच्या गोटण्यात खड्डा काढतात. त्या खड्डयात मेलेल्या जोग्याला रासमुरं झोपविलं जाते. मातीनं भरून खड्डा भरतात. जोग्याचा जो प्रमुख असतो तो उगवतीकडं तोंड करून उभा राहतो. डाव्या पायातल चप्पल काढून वरखाली करत मोठयानं बडबडतो,

" जगलीस तेवढ मातीत गेलं
चिंदी कुंदी झाडून नेल .... हितनं पुढं जलम घे
आई बापच व्हवून ये." [६]

जोग्याचा प्रमुख तो हातातील चप्पल मातीवर आपटतो. अशात-हेने जोग्याचा दफनविधी केला जातो.

0000 जोग्याचा मेळा 0000

लिंब नेसवण्याच्या ठिकाणी, देवीची स्थापना केल्यानंतर रात्रीचा देवीच्या नावानं जागर करतात. यल्लामा देवी कथा सांगितली जाते व देवीची गाणीही म्हटली जातात. मेळ्याचा प्रमुख चौंडकं वाजवणारा असतो. तो निरनिराळ्या गावातील आमंत्रण घेतो. त्याठिकाणी जागर घालतात. आर्थिक मोबदला मिळतो. अशा मेळ्यात दोन-तीन जोगतिणी, एक चौंडकंवाला, एक ढोलचीवाला व मेळ्याचा प्रमुख अशी मंडळी असतात.

प्रथम या मेळ्याची सुरवात सुती चौंडक्याच्या, ढोलचीच्या तालावर रेणुका देवीचं नमन करतात.

चला ग बायनु डोंगरी जाऊ या

लिंब नेसून परडी भरु या
कनवी भरमाप्पाला खारीक दोऊन वाटेला लागू या
जकाती दीऊन डोंगर चढू या
शिकर बघून नारळ फोडू या
येणी कुंडाला जाऊन तीरीत घेऊ या
परसरामाच्या समोर जोग बी घालू या

नमनं संपलं की रेणुका देवीची कथा सुरु करतात.

मनोळीच्या नदीला
गेली यल्लव्वा न्हायला
भरली घागर काकेला गऽऽ नदीच्या वाटेला
किरडू दिसलं वाटेला गऽऽ घागर काकेला
बाई भिऊन सुटली
घागर फुटली वाटेला, राग आला ग ... ऋषीला .[७]

कथा संपवितात व जोग्ये नाचतात. जोगतिणी गाणी गाते. पण आता मेळ्याचे स्वरुपही बदलत चालले आहे, त्याचे चित्रण केले आहे.

## भंडारभोग कादंबरीतील सामाजिक चित्रण

भंडारभोगाही कादंबरी जोगत्यांच्या जीवनाचे दर्शन घडविणारी व त्यांची समस्या मांडणारी कादंबरी आहे. त्यामुळे जोगता व जोगत्यांचा समाज, जोगता व जोगता, जोगता व जोगतिणी, जोगता व कुंटूंब यांच्या परस्पर संबंधाचे या सर्वांचे दर्शन घडते. यातूनच समाजजीवनाचे दर्शन घडते. जोग्याचे कींवा जोगतिणीचे दर्शन घडविताना कधी पात्राच्या संवादांतूनही समाज-जीवनाचे दर्शन घडते. सखु जोगतिणीच्या बोलण्यातून समाज आणि जोगतिणी यांच्या परस्पर संबंधाचे चित्रण येते. " मला काय बी कळत नव्हतं तवा मला देवाला सोडलं. पदर आला तवा देवाचं केलं. पयली रात पुजाऱ्या बरबर काढली. तवापास्नं दररोज नव्या बापयाची सवय पडली. आता हिशोब काढला तर निम्मं गाव माझ्याबरोबर झोपलंय. ह्या गावातलं बडंबडं सायेब माझ्याकडं येत्यात. गंमत करत्यात, जात्यात. ह्यास्नी माझ्या आनापाण्याची काळजी

न्हाई, पोराबाळाची काळजी न्हाई. ह्यांच्यापास्नं झाल्याली पोर आता मी रक्ताचं पाणी करून पोसतोय हे कशापायी ? कोण बी भेटला की डोळ्यानं येतीस काय म्हणतोय. ह्यांच्या आया बाया हे लोकास्नो का दीत नाहीत ? आमच्यावरच का बसत्यात ?"[८] समाजजीवनाचे चित्रण येथे स्पष्ट होते. तर आक्कु जोगतिणीला पाटलानं ठेवली होती. ती पाटलाची सेवा करत, जोगवा मागत नव्हती. पाटील सर्व लागेल ते देत होता. पाटील निवडणुकीला उभा राहतो. लोकांना भंडा-याच्या शपथेचा धाक दाखवून मतदान करण्यास भाग पाडतो. ते दुस-या पार्टीच्या लोकांना समजते. गावातील लोक आक्कु जोगतिणीला मारतात " नुस्तं मारलं आतसं तरबी बरं झालं असतं. रातीला दहा-बाराजणांनी वडली. लुगड्याच्या चिंध्या केल्या. सकाळी तोंडावर तांब्याभर पाणी मारलं. शेजारनोनी तव्हा शुध्दीवर आली! बघती तर अंगावर काय बी न्हाई. शेळीगत आरडली. गाव गोळा झालं. पाटलानं हिंग्लज ठाण्याला फिर्याद केलीया. सगळं झुपरीतच झालय बाबा आता ही जोगतीण कशाला पायजे व्हती फिरयाद ? गावातच दिवस घालवायचं म्हणजे असं करून जेमंल ?"[९] तर जोग्या व जोग्याचा परस्पराचे चित्रण करतात. जोग्याचे नातेवाईक कुणीच नसतात. जोग्ये हेच त्यांचे नातेवाईक असतात. एखादा जोग्या आजारी असेल तर सर्व जोग्ये एकत्र येतात. आजारी जोग्याची सेवा जोग्यच करतात. " मग काय करतोस बाई, आपल्यालाआपल्यात बघाय नको. आमच्या बिगार आमाला कोण हाय. आमचं आमीच एकमेकाला बघाय पायजे. माणसाचं येगळं आपले वेगळं! त्यास्नो नाती-गोती असतात. आमाला कोण हाय ? कोण हाय आपलं ? नातं काय गोतं ? घरची घरातल्यास्नी बघतील. संसारातील एकमेकाला सांभाळतील. आमच्या जोग्यांच आमच्याशिवाय कोण हाय ? मरताना माणसंबी जवळ इत न्हाईत. रस्त्यात माणसं लांब व्हत्यात. गावात माणसं भुजत्यात .... जोगतिणी बी कारणाकारणीच जवळ येत्यात. त्येचं सगळंच जग माणसागतं! आमच काय [१०] जोग्या व जोग्या यांच्या परस्पर संबंधाचे व कुटुंब व जोग्या यांच्या परस्पर संबंधाचे चित्रण येते. गावातील जोग्यांचो व जोगतिणीचो प्रमुख एक जोगतिण असते. तिचे सर्व ऐकत असतात. जर गैरवर्तन घडले तर तिचे संबंध तोडतात. तायाप्पा आणि रत्नाचे संबंध आहेत हे समजताच तान्नाका " हिथनं पुढं आमच्यातनं कशालाच यायचं न्हाई.

आणि तायाच्या तु बो एक! तुमचा आमचा संबंध संपला. तु हाईस आणि तुझं नसीब हाय. आमच्या मागनं काय आणायचंय न्हाई."[११] जर गैरवर्तन केले तर इतर जोग्यांचे आणि जोगतिणींचे संबंध कसे तोडले जातात याचे चित्रण येते. समाजातील प्रतिष्ठीत म्हणविणारी व्यक्तिचे चित्रण घडते. जोग्यांना व जोगतिणींना चांगलं जीवन जगायला मिळावं व सरकारकडून मदत जोगतिणींना मदत मिळावी यासाठी झटणारे मोरे मास्तर. मोरे मास्त तायाप्पा यांच्या संवादातून समाज जीवनाचे दर्शन घडते. " मास्तर, जोगतिण लई सुकी. त्येनी एकांदा बायच ठेवून घेतील, झुलवा लावतील. कायच जमलं न्हाई तर रस्त्याला जाणाऱ्याशी लगट करून चमड्याचो भूक मारून घेतील. पोटात एकाद्याचं बी वाढवितील .... आमी काय करायचं ? त्यास्नी लोक निदान खाजेसाठी तरी जवळ करत्यात .... जोगतीण मेली तर मडयाला तरी जमत्यात. कुणाच्या तरी बांधावर जागा देतात. आमचं काय ? नुस्त अंगाला अंग लागलं तर कच्च बारत्यात. त्येंच्या परास आमचंच लई वाईट हाय ...."[१२] यातून जोगता व जोगतिणींचे जीवन कसे वगळे आहे याचे चित्रण घडते. तसेच जोग्याचे समाजातील स्थान काय आहे याचेही चित्रण घडते. मोरे मास्तरांच्या बोलण्यातून सामाजिक जीवनाचे चित्रण येते. " आणि तु मला सांग ह्या सगळ्या जोगतिणी तुमच्या आमच्या खालच्या जातीतच का ? वाण्या-बामणाच्या का न्हाईत ? त्यांच्या पोरी देवीला वाहत नाहीत ? देवी आमच्या गरीबाच्याच मागं का लागती ?"[१३] मग रिवाज वरच्या लोकात बी पडाय नको ? बरं रिवाज हाय तो हाय. आमच्या ह्या जोगतिणीस्नी कोण जवळ घेतंय ? सगळी कामापुरतीच वापरत्यात. मुंबई-पुण्याला विकत्यात हे बी देवीनंच सांगितलंय ?"[१४] यातून जोग्ये व जोगतिणी कुठल्या समाजातील असतात, त्यांना कसं जीवन जगावं लागतं याचे चित्रण येते.

कधी पदासाठी व प्रसिध्दीसाठी भांडणारे कार्यकर्ते, स्वतःला सामाजिक कार्यकर्ता म्हणवून घेऊन, पण जोग्याना मदत न करणारा वसंतराव पाटील. देवदासी व जोग्यांचं दुःख माहित नसून त्यांच्याविषयी बोलणारी मंडळी, भविष्य सांगणाऱ्या जोगतिणी तिच्यावर विश्वास ठेवणारा समाज, समाजाचा देवदासीकडे व जोग्याच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन, तर कधी गाव आणि देवदासी

जोगता आणि कुटुंब यांचे परस्पर संबंधाचे चित्रण येते. शेतीवरील कामे, पेरणी, पाऊस, सण, उत्सव या सर्वांचे चित्रण येते. अशा विविध स्वरूपातून सामाजिक जीवनांचे चित्रण वास्तववादी व यथार्थ स्वरूपाने रेखाटलेले आहे.

## कौटुंबिक पातळीवरचे चित्रण :

भंडारभोग कादंबरीमध्ये कौटुंबिक पातळीवरचे चित्रण येते. तायाप्पाच्या कुटुंबात यल्लमा देवी नव्हती. त्याच्यात कोणीही देवदासी व जोगता नव्हते. अंधश्रद्धेला बळी पडून कल्लव्वा तायाप्पाला जोगता बनविते. त्यामुळे तायाप्पा जोगता झाल्यापासून घरचे वातावरण बदलते. माणसाच्या स्वभावात व वर्तनात फरक पडत जातो. भाव व कुटुंब यांचे परस्पर संबंध ही तणावाचे होत जातात. तायाप्पाचे वडिल बसाप्पाच्या वर्तनात फरक पडतो. गावातील लोक बसाप्पाला टोचून बोलतात. बसाप्पा शेतातील कामे करत नाही. दारू पिऊन घरी येत व क्षुल्लक कारणावरून भांडण करत. त्यामुळे बसाप्पा व कल्लव्वाचे भांडण होत असे. कल्लव्वा ही कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला जपणारी, आपलं कुटुंब चांगलं चालावं, यासाठी झटत असते. तायाप्पा जोग्या झाल्यापासून कुणाशी बोलत नाही. एकटाच विचार करत कुढत असतो. संगाप्पा आपल्या मुलाची काळजी करतो. वाटून घ्यावे असे वाटते. रत्ना आणि तायाप्पाचं प्रकरण संगाप्पाला समजते. तायाप्पा बरोबर भांडण करतो. तायाप्पाला मारतो. घराच्या बाहेर काढतो. कारण संगाप्पा प्रतिष्ठेला जपत असतो. तायाप्पा गावाबाहेर खोपाट बांधून राहतो. घरातील कुणीच भेटायला व चौकशी करायला जात नसे. तायाप्पाची आई तेवढी भेटून येत असे. तायाप्पा आपला कुणीच नाही असे घरी लोक सांगत असतात. कारण तायाप्पाची बहीण सुमीच्या लग्नाचा प्रश्न असतो. अशा विविध स्वरूपात परस्परांच्या संबंधाचे चित्रण वास्तवपूर्ण व यथार्थ रित्या येते.

## ** जोग्या व जोगतिणीचा उदरनिर्वाह **

जोग्याना व जोगतिनीना आपला उदरनिर्वाह स्वतःच करावा लागतो. एकतर कुठल्यातरी मेळ्यात सहभागी होतात. ज्याठिकाणी मेळा असेल त्या ठिकाणी जायचे. रात्रभर देवीचा जागर घालयाचा व मेळ्याचा मालक देईल

ते पैसे घेऊन परत यायचे. मंगळवार व शुक्रवार या दोन दिवसी गावात जोगवा मागायचा, मिळालेल्या धान्यावर पोट भरायचे. एखादी देवदासी झुलवा म्हणून राहते. ज्यानं झुलवा लावला असेल तो तिचा सगळा खर्च चालवितो. जोगतीणीसि भेटायला येणारी माणसं जाताना पैसे देऊन जातात. काही देवदासी वेश्या व्यवसाय करून पोट भरतात. जोगे ही निरनिराळी कामे करतात. जोगवा मागून जगतात. कोंबड्या पाळतात. भविष्य सांगतात अशा स्वरूपाची कामे करून पोट भरत असतात. देवदासींना सरकारकडून मदत तरी मिळते. पण जोग्याला सरकारकडून कसलीच मदत नाही. अशा जोग्याचं व जोगतिणीचं म्हातारपणी फार हाल होतात. कुणाचाही आधार नसतो.

## करणी करणे, कौल लावणे

ग्रामीण भागात एकमेकावर करणी करणे, कौल लावणे, तोडग्यावर उपाय सांगणे, भंडारा देणे असे आढळते. हाही एक समाजजीवनाचा भाग आहे. त्याचेही चित्रण भंडारभोग कादंबरीत आढळते.

गावातील तानू सुतारीनं लोकांच्या तोडग्यावर उपाय सांगते. कल्लव्वा आपल्या मुलाचा ताप कमी होत नाही. तानू सुतारीनला विचारते. तानू सुतारीन पाटावर तांदळाची चिमुट टाकून कौल लावून आलेल्या स्त्रियांना उपाय सांगते. तसेच ती कल्लव्वाच्या पोरांच्या नावानं कौल लावते. पाचही कौल उलटे पडतात. " सगळं कोंडयागत दिसतंय बाई पोरगं काय लवकर ह्यातनं भाईर पडंल असे दिसत न्हाई."[१५]

तायाप्पाचा ताप कमी होत नाही. शेवंता जोगतिणीला विचारते. ती भंडारा देते. ती भंडारा तायाप्पाला खायला देते. भंडारा खाल्यामुळेच तायाप्पाचा ताप कमी झाला असा कल्लव्वाचा समज होतो.

तायाप्पा-तान्नाकाची देवीची गादीची पुजा करत होता. त्यांच्याही अंगात देवी संचारत होती. ती तोडग्यावर उपाय सांगत असे. एकानं तायाप्पाला तोडगा सांगितला " देवा सगळंच कोंडयागत हाय. म्हशीला कल गोटणावर फिरवून आणली. दावं लावलं आनी एकाएकी कावदारली. कसला त्यो कातेला हात लाऊ दीना."[१६] तायाप्पानं परडतीनं तांदळाची चिमट घेतली. पाटावर टाकली. जोडया लावल्या. काकु सगळाच बाई घोटाळा.

पोड-या दमडाजवळ वार झालयं. उतारा टाकाउ पायजे. त्याशिवाय काय खर न्हाई."[१७]

कौल लावणे, भंडारा देणे, तोडग्यावर उपाय सांगणे हाही एक समाजजीवनाचा भाग आहे. त्याचे चित्रण लेखकाने यथार्थरीत्या केले आहे.

भंडारभोग कादंबरीतील सामाजिक जीवन चित्रण कोणत्या प्रकारे आले याचा अभ्यास केल्यानंतर "चौंडकं" या कादंबरीत सामाजिक जीवन कोणत्या स्वरुपात आले आहे.याचा अभ्यास करावयाचा आहे.

=-:x: चौंडकं कादंबरीतील धार्मिक विधी :x:-=

लिंब नेसण्याचा विधी

चैताच्या पुणवेला लिंब नेसवण्याचा विधी केला जातो. लिंब नेसवण्याचा विधी एका ठराविक क्रमाने करावा लागतो. प्रथम मनोळीच्या नदीवर आंघोळ करावी लागते. नदीच्या पुजा करुन उघड्या अंगावरच लिंबाच्या डाळ्या बांधून यल्लमादेवीपर्यंत चालत जावे लागते. सुलोलाही आंघोळ घालून लिंबाच्या डाळ्या बांधून देवीपर्यंत चालत जावे लागते. जोगळभावीच्या देवळापाशी आल्यानंतर पुरणपोळीचा नैवेद्य करावा लागतो. आपआपल्या परड्या पुजाव्या लागतात. काही बायका याठिकाणी लिंब नेसतात. नंतर होमकुंडाला जावे लागते. होमकुंडाजवळील पुजारी अंगावर पाणी मारतो. बाजूला होऊन आंघोळ करावी लागते. परशारामच्या देवाचे दर्शन घ्यावे लागते. परशारामच्या देवळात नवं कापडं, यल्लु आईला खण, आणि पुजा-यासाठी रुपया द्यावा लागतो. पुजारी गळ्यात फुलमाळ व कपाळाला भंडारा लावतात.

गल्ल्याच्या जोगतिणी एकत्र येतात. परडीत पोळीचा नैवद्य भरतात. सगळ्या परडया देवीच्या कळसाकडे तोंड करुन पुजल्या जातात. लिंब नेसलेल्या देवदासीला नवीन कापड घालतात. सुपारी, नारळ, पानाचा वीडा हातात देऊन, उगवतीकडं तोंड करुन बसवतात. तिच्या हातात परडी व गळ्यात कवडयाची माळ घालतात आणि पाच वेळा "उदं गं आई उदं उदं " म्हटले जाते. बाकीच्या जोगतिणी गायला सुरवात करतात.

- आईच्या दरबारी

-- लोक जलमाची बांधली

--- परसु देवाच्या शापथीनं

---- बया डोंगराची जाहली

अशा रितीने लिंब नेसवण्याचा विधी पूर्ण केला जातो. हा विधी देवदासीला करावा लागतो. त्याशिवाय देवदासी होत नाही. लेखकाने यथार्थरित्या वास्तव्याला धरून चित्रण केले आहे.

०४-०: कौटोंबिक पातळीवरचे चित्रण :०-४०

चोंडकं या कादंबरीत कुटुंबाला प्राधान्य दिलेले आढळते. कुटुंब आणि समाज यातून कादंबरी घडत जाते. सुबानाच्या घरात यल्लामा देवी नसते. त्यांच्या कुटुंबात कोणी जोगता कींवा जोगतीण नव्हते. तरी अंधश्रध्देला बळी पडून बायजानं सुलीला देवदासी बनवले. अशावेळी कुटुंबात सुबाना आणि बायजा, सुबाना आणि आई, आई व सुली यांचे परस्पर ताण-तणावाचे चित्रण आढळते. सुबानाची आर्थिक परिस्थिती नसताना व्याजात शेत देऊन देवीचा धार्मिक विधी पूर्ण केला जातो. शेवंता जोगतीण सुलीच्या डोक्यातील बट राखण्यास सांगतो. त्यावेळी सुबाना आणि बायजाचे मतभेद होतात. सुबानाचे मत देवीची स्थापना करायची नाही; तर बायजाच मत असते देवीची स्थापना करायची या तणावाचे चित्रण यथार्थपणे केले आहे. सासूच ही मत देवीची स्थापना करावी. संसार व्यवस्थीत चालेल. सुबानाच्या आईला अर्धांगवा झटका येतो. त्याच कारण आक्कु जोगतीण सांगते. सुलीनं चार घर जोगवा मागाय पाहिजे. त्यावेळी सुबानाच्या मनाची अवस्था केविलवाणी होते. सुलीला वाटते सगळ माझ्यावरच कस येतय. याचा तिला प्रश्न पडतो. सुली जोगवा मागत असताना सुलीची कळ काढली जाते. सुबाना ह्याला कळ काढणाऱ्यास मारावे वाटते. सणाचं घरात आपल्या मुलं नाही याची दोघांनाही खंत असते. दोघांच्या मनाचे चित्रण केले आहे. सुलीच्या वर्तनात फरक बघून सुबाना आणि बायजा सुलीबरोबर बोलत नाही. सुलीला दिवस गेल्याचे सुबानाला कळते त्यावेळी सुलीस काठीने मारतो. अशावेळी बायजाच्या माहेरची माणसं येतात. शेवटपर्यंत बायजाचा राग सुलीवरचा कमी होत नाही. सुली

देवदासी बनल्यामुळे कुटुंबाची वाताहत कशी होते. परस्पराचे ताण-तणावाचे चित्रण लेखकाने यथार्थरित्या रेखाटले आहे.

## सामाजिक चित्रण -

"चौंडकं" या कादंबरीत एका कुटुंबातील देवदासी होती. पण या कुटुंबाचा समाजाशी संबंध येतो. कोणतेही कुटुंब स्वतंत्रीरित्या राहू शकत नाही. परस्परावर अवलंबून रहावं लागत. ज्यावेळी दोन कुटुंब एकत्र येतात त्यावेळी समाज तयार होतो. कुटुंब हा समाजाचा घटक असतो. बायजाला भरणारी करक, कोणत्याही गोष्टीत न येणार यश ही समस्या आक्कु जोगतिणीला सांगते. आक्कु जोगतीण सुलीची बट राखण्यास सांगते. बायजा तयार असते. पण सुबाना तयार नसतो. दोघाचे मतभेद होतात. सुबानाची त्यावेळी गावातील माणसं येऊन सुबानाची समजूत घालतात. देवीचं म्हातम पटवून सांगतात. सुबानाचं मन परिवर्तन करण्याचा प्रयत्न करतात. शेवटी सुबाना तयार होतो. तसेच भाऊबंदात एकमेकात चांगलं चाललेलं बर वाटत नाही. एकमेकावर करणी करतात. दुसऱ्याच्या दारात लिंबू सुया टाकतात. सुलीच्या धार्मिकविधीला सुबानाजवळ पैसे नसतात. अशावेळी पैशाची गरज गावातील सावकार देतात. देताना जमीन व्याजात दिली जाते. सुबाना, बायजा व सुली यल्लमा देवीला जात असताना भेटणारी निरनिराळ्या स्वभावाची माणसं. त्याच्याशी आलेला संबंध. बायजाच्या घरात काही वाईट घडलं, आक्कु जोगतिणीकडे जाणे, म्हातारीला अर्धांगीचा झटका आल्याबरोबर आक्कु जोगतिणीला विचारतात. त्यावेळी सुलीनं जोगवा मागाय पाहिजे; असे सांगते. बायजा आजारी असते त्यावेळी गावातील स्त्रिया बघून जातात. सुली जोगवा मागत असताना गावातील मंडळी तिची कळ काढतात. तिची अवहेलना करतात. सुली बबन्याच्या प्रेमात पडते. बबन्याचे वडिल बबन्याला मारतात. दोन्ही घराणी वेगळी असतात. सुलीला बबन्यापासून दिवस गेल्याचे समाजात, गावात, तिकटीवर, पाणवठयावर सगळीकडे चर्चा होते. प्रत्येकजण टोचून बोलत असतो. सुबानाला सुलीला दिवस गेल्याचे समजते. त्यावेळी सुलीला मारण्यास लागतो. गाव गोळा होते, सुलीला सोडवतात. शेतीतील काम करीत असताना बबन्या सुबानाला मदत करतो, बायजाला दवाखान्यात नेण्यासाठी

बबन्या गाडीबैल देतो. त्याचबरोबर निरनिराळे सण, उत्सव यांचेही चित्रण येते. तसेच जोगतिणींना कोणत्या प्रकारे जीवन जगावे लागते व त्या कशा-प्रकारे जीवन जगतात. आपला उदरनिर्वाह कसा करतात या सर्वांचे चित्रण येते. लेखकाने सामाजिक जीवनांचे चित्रण वास्तव व यथार्थपूर्ण रित्या केले आहे.

### xxxx==-: देवदासीकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन :-===xxxx

समाजातील लोकांचा देवदासीकडे बघण्याचा दृष्टिकोन, देवदासीबद्दल मनामध्ये असलेली मते व्यक्त झाली आहे. सुली डोंगरावरून लिंब नेसून गावात आल्यानंतर गावातील मंडळीचा सुलीकडे बघण्याचा दृष्टिकोनबद्दल इग-याची तुळसाी सुलीला बोलते. सुलीला आजीला विचारते " ती रांड म्हणालती, मला म्हणं देवाला सोडलीया गावाला सोडलीया असं लई काय म्हणालती .... त्या रांडनं असं का म्हणावं गं ."[१८] पण सुली लहान असल्यामुळे सुलीला काहीच समजत नाही. पण आजी काही या प्रश्नाचं उत्तर देत नाही. सुली जोगवा मागत असताना सख्या मान्या सुलीला " आरं हिच्या आयला शेपारलीस की ? खरं, शेवट गावची धन."[१९] सुली मान्याबरोबर भांडण काढते. गावातील मंडळी सोडवतात. ती जोगवा मागायला पुढे जाते. दारातल्या बायका " हिला तरी जोगतीला एवढं कशाला पायजे ....जोगतीण ती, जोगतीण आणि आव कसा सव्वासिनीचा आणती .... "[२०] सुलीचं आणि बबन्याचं संबंध गावातील लोकांना व बायकांना समजते. गावात चर्चा होते. सुलीला सगळी नावे ठेवू लागतात. सुता " तिला कसं कळंन गावचं पोक, कुणीबी जनावर सोडावं ही मोकळीच की देवाची ती देवाची तिला कशाचं काय आणि काचं काय ?"[२१] यावरून देवदासीकडे लोकांचा दृष्टीकोन लेखकाने यथार्थ व वास्तववादीरूपात रेखाटला आहे. देवदासीकडे उपभोग घेण्याच्या दृष्टिकोनातून बघतात याचे चित्रण येते.

### समाजातील अंधश्रध्दा **

देवावर अगर देवीवर समाजाची श्रध्दा असते. कोणत्याही घटनेमागचे कार्यकारण भाग समजून घेतला पाहिजे. जर तो समजून घेतला नाही तर अंधश्रध्दा निर्माण होते व त्याठिकाणी बुवाबाजी व ढोंगीपणा निर्माण होतो. सुलीच्या

ठिकाणी बट निर्माण होते. कारण दोन-तीन आठवडे आंघोळ न केल्यामुळे तेल-फणी न केल्यामुळे बट निर्माण होते. पण हा संबंध न जाणल्यामुळे मुलीला देवदासी बनवलं जात. म्हातारीला अर्धांगीचा झटका येतो. म्हातारीपण कोणताही रोग होऊ शकतो. आक्कू जोगतिणीला विचारतात ती सांगते. मुलीनं जोगावा मागितला पाहिजे. अशाप्रकारे अंधश्रध्दा निर्माण होते. हाही समाज जीवनातील भाग आहे. त्याचे चित्रण येते.

oo:x: कौल लावणे, संकेत - याचे चित्रण येते :x:oo

ग्रामीण भागात लोकप्रथा, लोकरूढी, संकेत असतात अशा संकेताचे चित्रण कादंबरीत येतो. सांयकाळी उंबऱ्यावर बसू नये, सांयकाळी उंब-यावर इब्बत वडणे.

" अग ये हुबाले कातर येळचं उंबा-यावरं बसू नग आत ये "[२२]

देवीचं कोणतही कार्य करीत असतांना मनात काही आणू नये, नाहीतर आपलं काम चांगलं होणार नाही. अडचणी येतात. " तरं न्हवं शांता अशा येळंला मनात किंतु आसू ने."[२३] ग्रामीण भागात कौल लावणे, तोडग्यावर उपाय सांगणे, भंडारा देणे, एकमेकावर करणी करणे आढळते. तो समाज जीवनाचा भाग आहे. त्याचेही चित्रण आलेले आहे.

ӨӨӨӨӨӨӨӨ सा रां श ӨӨӨӨӨӨӨӨ

"भंडारभोग" व "चौंडकं" कादंबरीत सामाजिक चित्रण कोणत्या प्रकारे आले ते पाहिले. भंडारभोग कादंबरीत आलेले जोगत्यांच्या जीवनातील धार्मिक विधी आलेल्या रांडपुनव विधी, जोगत्याचा मेळा, जोगत्याचा दफाविधी इत्यादी विधीचे कोणत्याप्रकारे चित्रण आले आहे ते पाहिले. देवदासी व जोग्याना आपला उदरनिर्वाह करण्यासाठी कोणकोणती कामे करावी लागतात कादंबरीत आलेले सामाजिक जीवन, कौटोंबिक जीवन याचे चित्रण, भंडारा देणे, कौल लावणे, तोडग्यावर उपाय सांगणे याचेही चित्रण आलेले आहे. चौंडकं कादंबरीत आलेले धार्मिक विधी चित्रण, सामाजिक व कौटोंबिक पातळीवर

असे चित्रण झालेले आहे. देवदासीकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन, समाजातील अंधश्रद्धा, कौल लावणे, भंडारा देणे, यांचेही चित्रण कादंबरीत आढळते. दोन्ही कादंबरीतील झालेले सामाजिक जीवन हे वास्तव व यथार्थपणे चित्रित केलेले आहे.

## प्रकरण : तिसरे

### संदर्भ ग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| [१] | नेमाडे भालचंद्र | : | " कादंबरी "<br>मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप.<br>संपादक गो.मा.पवार.<br>म.द.हातकणंगलेकर,<br>पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८६, पृ. २४ |
| [२] | गवस राजन | : | "भंडारभोग"<br>मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे,<br>प्रथमावृत्ती, फेब्रुवारी, १९८८<br>पृ. १०५ |
| [३] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. १४० |
| [४] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. १४४ |
| [५] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. २२१ |
| [६] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. २२३ |
| [७] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. १५१ |
| [८] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. २३६ |
| [९] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. १७० |
| [१०] | तत्रैव | : | तत्रैव, पृ.२१२ |
| [११] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. १३१ |
| [१२] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. २३८ |
| [१३] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. २२६ |
| [१४] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. २२६ |
| [१५] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. ७ |
| [१६] | तत्रैव | : | तत्रैव, पृ.२०८ |
| [१७] | तत्रैव | : | तत्रैव, पृ. २०८ |

[१८] गवस राजन : "चौंडकं"
मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे,
प्रथमावृत्ती, ऑगस्ट, १९८५

[१९] तत्रैव : तत्रैव, पृ. ७३

[२०] तत्रैव : तत्रैव, पृ. ७४

[२१] तत्रैव : तत्रैव, पृ. १३४

[२२] तत्रैव : तत्रैव, पृ. २

[२३] तत्रैव : तत्रैव, पृ. २२